# “भटक्या विमुक्त जमातीची क्षेत्रीय पहाणी”

**प्रा. डॉ. घाडगे डी. के**
विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर (स्वायत्त)
Email – devanandghadge071@gmail.com

**सारांश –**

भारतीय जातीसमुदायाचा अभ्यास करत असताना आपल्याला त्याचे वेगवेगळ्या स्वरुपात वर्णन करावे लागेल. त्यामध्ये विमुक्त, भटके, अर्धभटके अशा पद्धतीने त्याचे वर्णन केले गेले आहे. भारतीय पातळीवर भटक्या जाती जमातीचा अभ्यास करत असताना आपल्याला असे दिसून येते कि भारतामध्ये जवळपास ५७१ विमुक्त जमाती, १०६२ भटके व २५ अर्धभटके अशा एकूण १६५८ जमाती  असल्याचे आढळून येते. त्यामध्ये काहींना गुन्हेगार जमाती म्हणून समजले गेले. ज्या गुन्हेगार जमाती आहेत त्यामध्ये १४ जमाती या विमुक्त जमाती म्हणून त्यांची गणना केली. त्याचबरोबर ज्या ४७ जमाती आहेत त्या जमातीपैकी काहींना नोंदणीकृत जमाती म्हणून संबोधले गेले. तसेच त्यांना Notified tribes असे म्हंटले गेले, तर ज्यांची नोंदणी नाही अशांना De Notified tribes असे म्हंटले गेले.

**Keywords –** गुन्हेगार जमाती, भटक्या जमाती

**प्रस्तावना –**

जगातील सर्व देशात भटक्या आदिवासी जमातीचे अस्तित्व असल्याचे आपल्याला दिसून येते. विशेषतः आशिया, आफ्रिका आणि अमेरिका या खंडातील देशात आदिवासी जमाती मोठ्या प्रमाणात आढळतात. १९९७ च्या आकडेवारीनुसार जगातील ७० देशात आदिवासी जमाती आढळून येतात. त्यांची संख्या हि कमी अधिक प्रमाणावर आहे. जगभर सर्वत्र राष्ट्रीय सीमेमुळे आदिवासी लोक हे अनेक भागात विभागलेले आहेत उदाहरणार्थ इनूईट (एस्किमो) लोक हे, कॅनडा, ग्रीनलंड, संयुक्त संस्थाने आणि रशिया या देशात विखुरलेले आहेत. आफ्रिकेतील फुलंगी जमातीचे लोक ८ देशात पसरलेले आहेत. ‘यपुअन्स’ हे इंडोनेशियातील आदिवासी आहेत. ‘पापुआ’ न्युगिनी, मिसा व लुशाई जमातीचे लोक भारत आणि म्यानमार या देशाच्या भूमीवर पसरलेले आहेत. जवळपास ५०% लोक मिस्रो म्यानमारमध्ये राहतात. आदिवासी लोक हे चौथे जग म्हणून ओळखले जाते. जागतिक सभेने दुसऱ्या (साम्यवादी गट) आणि तिसऱ्या (विकसनशील गट) जगापासून वेगळे असल्याचे स्पष्ट केले आहे.

**अभ्यासाचा उद्देश –**

१. भटक्या विमुक्त जाती जमातीचा संवर्गनिहाय अभ्यास करणे.
२. भटक्या विमुक्त जातीच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक बाबीचा अभ्यास करणे.
३. भटक्या विमुक्त जमातीच्या गुन्हेगारी प्रकृतीचा अभ्यास करणे.

आदिवासी समाजजीवनाचा अभ्यास करत असताना मानववंशशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ यांनी त्यांचे विविध दृष्टीकोनातून विवेचन केले आहे. आदिवासी समाज हा समग्र समाजातील एक प्रकार आहे. आदिवासीमध्ये भटक्या आणि विमुक्त जमातीचा विभाग हा प्रमुख अभ्यास समाजाला जातो. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३४२ प्रमाणे भटक्या जमातीच्या बाबतीत असे दिसून येते कि त्यांनी त्यांची स्वतःची एक स्वतंत्र भाषा, संस्कृती, सण, उत्सव, रूढी-परंपरा यांचे एक वेगळेपण टिकवून ठेवलेले आहे. या जमाती प्रामुख्याने दऱ्या-डोंगरात तसेच जंगलव्याप्त प्रदेशात आपले वास्तव्य करतात म्हणून त्यांना जंगलातील जाती, वनवासी जनजाती अशा विविध नावाने ओळखले जाते. भारतीय संविधानात त्यांचा समावेश अनुसूचित जमाती असा करण्यात आलेला आहे. समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञ यांनी त्यांची वेगवेगळी वैशिष्टे सांगितलेली आहेत.

**आदिवासी जमातीची वैशिष्टे –**

१. या जमातीला तंत्रज्ञान अवगत नव्हते.
२. जंगलातील झाडपाला, फुले, फळे, डिंक, लाख, मध जमा करून आपली उपजीविका करणे.

३. शिकार, मासेमारी करणे, त्यावर उपजीविका करणे.

४. चोऱ्या माऱ्या करणे, लुटालूट करणे आणि उपजीविका करणे इत्यादी

भारतीय समाजशास्त्रज्ञ डॉ. जी. एस. घुर्ये यांनी त्यांना तथाकथित मुळचे रहिवासी व मागसलेले हिंदू (backword hindu) असे म्हटले तसेच डॉ. डी. एन. मुजुमदार यांनी 'समान नाव असणारा, एकाच भूप्रदेशावर वास्तव करणारा, एकच भाषा बोलणारा व विवाह व्यवसाय इत्यादी बाबतीत समाज निषेध नियमांचे पालन करणारा व परस्पर उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने एक पद्धतशीर व्यवस्था स्वीकारणाऱ्या कुटुंबाचे किंवा कुटुंब समूहाचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी होय' अशी व्याख्या केली.

**आदिवासी समाजाची संकल्पना –**

इंग्रजीमधील Tribe या शब्दाचा अर्थ 'जमात' असा होतो. आदी पासून किंवा अगदी सुरवातीपासून ज्यांचे वास्तव्य हे जंगलात, दऱ्याखोऱ्यात आहे अशांना आदिवासी असे म्हटले जाते. 'डॉ. व्हेरीयर एल्विन आणि ठक्करबाप्पा' यांनी आदिवासींना 'Aboriginal' म्हणजेच मुळचे निवासी असे संबोधले तर भारतीय संविधानात आदिवासींना अनुसूचित जमाती असा उल्लेख केला गेला.

१९६२ मध्ये 'शिलॉग' येथे आदिवासींची एक जागतिक परिषद भरली होती. या परिषदेमध्ये आदिवासी जमातीची एक व्याख्या केली. त्या परिषदेनुसार आदिवासी कोणाला म्हणावे तर "समान भाषा बोलणारा, एकाच पूर्वजांपासून आपली उत्पत्ती सांगणारा, एका विशिष्ट भूप्रदेशावर वास्तव्य करणारा, तांत्रिक ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेला, अक्षर ओळख नसलेला व रक्तसंबंधावर आधारित असलेला गट तसेच सामाजिक व राजकीय प्रथाचे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला आदिवासी म्हटले गेले."

**महाराष्ट्रातील भटक्या जमातीचे स्वरूप -**

महाराष्ट्रात भटक्या विमुक्त जमातीची एकूण ४७ इतकी संख्या मानली गेली आहे. त्यापैकी १४ जमाती या विमुक्त जमाती ह्या ब्रिटीशांच्या काळात गुन्हेगार जमाती म्हणून जाहीर केल्या गेल्या होत्या तर १८ जमाती या भटक्या जमाती म्हणून ओळखल्या गेल्या. या जमातीच्या पोटजातीचा विचार केला तर त्यांची एकूण संख्या सुमारे २०० पेक्षा अधिक असल्याचे दिसून येते. या सर्व जमाती या स्वतःला स्वतंत्र आणि इतर जमातीपेक्षा वेगळया मानतात. या जमाती अंतर्गत रोटीबेटी व्यवहार केले जात नाहीत मात्र अलीकडील काळात त्यांच्यात मोठ्या प्रमाणात बदल होत असल्याचे चित्र दिसून येते. या जमातीचे लोकजीवन हे भिन्नभिन्न स्वरूपाचे असून या जमाती ह्या माळरान, डोंगरमाथ्यावर राहताना दिसून येतात. प्रत्येक जमातीचे पाल हे वेगवेगळे असून त्यांच्या प्रत्येकाच्या पालावर वेगवेगळ्या रंगाचे झेंडे निशाण असते. भटक्या जमातीची वर्गवारी बघता आपल्याला असे दिसेल कि त्यांना,

१. कलावंत जमाती

२. कष्टाची कामे करणाऱ्या जमाती

३. देवदेवतांच्या नावाने भिक मागणाऱ्या जमाती

४. ज्योतिष आणि भविष्य सांगणाऱ्या जमाती

५. व्यवसाय करणाऱ्या जमाती

६. पशुपालक जमाती

७. पशुपक्ष्यांची शिकार करून जगणाऱ्या जमाती होय.

उदरनिर्वाहाचे कोणतेच साधन नसल्यामुळे त्यांना चोऱ्या करणे, दरोडे घालणे व गुन्हेगारी मार्गानेच आपली उपजीविका करण्याचे मार्ग शिल्लक ठेवले. एकाअर्थाने या देशातील भटक्या विमुक्त जमातीची वाटचाल गुन्हेगारीकडे केली असे म्हंटल्यास अतिशोक्ती ठरणार नाही आणि हे केवळ इथली वर्गव्यवस्था व समाजव्यवस्था त्याला कारणीभूत आहे.

स्वातंत्र्याची ७० वर्षे उलटून गेली पण भटक्या जमातीची स्थिती अजूनही सुधारलेली नाही. भारतात आजघडीला जवळपास १४ कोटी भटक्या विमुक्त जमातीची लोकसंख्या आहे. त्यांना भारतीय संविधानात घटनात्मक संरक्षण देवूनही त्यांची स्थिती न घरका न घाटका अशीच आहे.

**भटके कोणाला म्हणावे** –

भटके किंवा भटक्या जमाती या आदिवासी समाजाचा एक भाग आहे. भटकी जमात हि एक संकल्पना आहे. त्यांचा एक स्वतंत्र गट म्हणून विचार केला जातो. भटक्या जमातीचे लोक हे कायम एका ठिकाणी स्थायिक नसतात.
ते अन्न-पाण्याच्या आणि निवाऱ्याच्या शोधात सतत भटकंती करत असतात त्यामुळे त्यांना भटके असे म्हंटले गेले. ते ठराविक काळातच एका ठिकाणी स्थायिक होतात. भटक्या जमातीची अर्थव्यवस्था हि साधी आणि सरळ स्वरुपाची असते. त्यांच्या गरजा भागवल्या जातील एवढेच ते उत्पादन करतात. या भटक्या विमुक्त जमाती ह्या भारताच्या सर्वच प्रांतात कमी अधिक प्रमाणावर दिसून येतात. महाराष्ट्रात ज्या भटक्या विमुक्त जाती जमाती आहेत त्यांची गावपातळीवर नोंद झाल्याचे दिसून येत नाही. ज्यांची नोंद झाली त्यांना 'Notified Tribes' आणि ज्यांची नोंद झाली नाही त्यांना 'DeNotified Tribes' असे म्हंटले गेले. ३६ राज्य आणि ७ केंद्रशासित प्रदेशांचा अभ्यासदौरा या पाहणीत असे आढळून आले कि, देशात असा एकूण ५७१ विमुक्त, १०६२ भटके व २५ अर्धभटके अशा एकूण १६५८ जमाती असल्याचे आढळून येते.

महाराष्ट्रात Nomadic Tribes आणि De Notified Tribes आहेत. अशा भटक्या जमातीची संवर्गनिहाय नोंद करण्यात आलेली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जाती जमातींची संख्या हि ४७ एवढी आहे. त्यात De Notified Tribes ची लोकसंख्या हि १,०५१,०२१३ एवढी आहे. ज्या De Notified Tribes आहेत त्यात बेरड, बेस्तर, भामटा, कैकाडी, कंजारभट, लमाणी, फासेपारधी, भामटा राजपूत, रामोशी, वडार, वाघारी आणि छप्परबंद या १४ जमातीचा (VJNT) व्ही. जे. एन. टी. या संवर्गात समावेश करण्यात आला आहे.

**Nomadic Tribes –**

महाराष्ट्रात ज्या भटक्या विमुक्त जमाती आहेत त्यामध्ये बावा, बेलदार, भारुडी, गारुडी, चित्रकथी, घिसाडी, गोंधळी, गोपाळ, जोशी, रावळ, वासुदेव, भुते, चलवादी, गोला, हेलवे, काशी कापडी, कोल्हाटी, मरीआईवाले, मसंजोगी, नंदीवाले, पांगुळ, शिकलगार, ठाकर, वैदू इत्यादी जमातींचा समावेश होतो. या सर्व जमातींचा प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या संवर्गात समावेश होतो.

तक्ता क्रमांक १

| क्रमांक | राज्य | बंजारा | वडार | कैकाडी | पारधी | कंजारभाट | बेरड |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अरुणाचल प्रदेश | ST | SC | SC | SC | SC | SC |
| २ | कर्नाटक | SC | SC | SC | ST | ST | ST |
| ३ | दिल्ली | SC | SC | SC | ST | ST | SC |
| ४ | उत्तर प्रदेश | OBC | OBC | SC | ST | ST | ST |
| ५ | ओडीसा | ST | SC | SC | ST | ST | SC |
| ६ | बंगाल | ST | ST | ST | ST | ST | SC |
| ७ | बिहार | ST | ST | SC | ST | ST | ST |

ISSN : 2581-8848

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | गुजरात | ST | ST | SC | ST | ST | ST |
| ९ | हिमाचलप्रदेश | SC | SC | SC | ST | ST | ST |
| १० | राजस्थान | SC | SC | SC | ST | ST | SC |
| ११ | महाराष्ट्र | DNT | DNT | SC | ST | DNT | DNT |
| १२ | तामिळनाडू | DNT | DNT | SC | ST | DNT | DNT |

प्रा. मोतीराज राठोड

(Denotified and Nomedic tribes in Maharashtra)

तक्ता क्रमांक २

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बहुरूपी | अरुणाचल प्रदेश NT | गुजरात NT | महाराष्ट्र NT | मध्यप्रदेश NT | कर्नाटक SC |
| २ | बावा | गुजरात SC | महाराष्ट्र NT | मध्यप्रदेश NT | - | - |
| ३ | बेलदार | मध्यप्रदेश SC | ओडीसा SC | उत्तरप्रदेश SC | बंगाल SC | महाराष्ट्र NT |
| ४ | भामटा | महाराष्ट्र NT | अरुणाचल प्रदेश DN | गुजरात DNT | - | - |
| ५ | भोई | कर्नाटक SC | ओडीसा SC | महाराष्ट्र NT | - | - |
| ६ | बुडबुडके | महाराष्ट्र NT | अरुणाचल प्रदेश NT | गुजरात NT | - | - |
| ७ | चलवादी | महाराष्ट्र NT | अरुणाचल प्रदेश SC | गुजरात NT | - | - |
| ८ | चीत्तपराधी | महाराष्ट्र ST | गुजरात NT | मध्यप्रदेश NT | कर्नाटक NT | - |
| ९ | डावरी गोसावी | महाराष्ट्र NT | गुजरात NT | उत्तरप्रदेश NT | - | - |
| १० | गाडीलोहर | महाराष्ट्र NT | मध्यप्रदेश NT | गुजरात NT | राजस्थान NT | - |
| ११ | घंटीचोर | महाराष्ट्र NT | गुजरात NT | मध्यप्रदेश NT | दिल्ली NT | - |
| १२ | गारुडी | महाराष्ट्र NT | गुजरात NT | मध्यप्रदेश NT | - | - |
| १३ | घिसाडी | महाराष्ट्र NT | गुजरात NT | मध्यप्रदेश NT | दिल्ली NT | राजस्थान NT |
| १४ | भोला | महाराष्ट्र NT | गुजरात NT | अरुणाचल प्रदेश NT | - | कर्नाटक NT |
| १५ | गोंधळी | महाराष्ट्र NT | अरुणाचलप्रदेश NT | कर्नाटक NT | गुजरात NT | - |
| १६ | गोपाळ | महाराष्ट्र NT | मध्यप्रदेश NT | गुजरात NT | - | - |
| १७ | जोगी | महाराष्ट्र NT | हिमाचलप्रदेश SC | तामिळनाडू DNT | गुजरात NT | - |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १८ | कहार | महाराष्ट्र NT | गुजरात NT | मध्यप्रदेश NT | - | - |
| १९ | कापडी | महाराष्ट्र NT | गुजरात NT | मध्यप्रदेश NT | - | - |
| २० | कोल्हाटी | महाराष्ट्र NT | मध्यप्रदेश NT | कर्नाटक NT | - | - |
| २१ | मसन जोगी | महाराष्ट्र NT | अरुणाचलप्रदेश DNT | कर्नाटक SC | - | - |
| २२ | शिकलगार | महाराष्ट्र NT | पंजाब SC | दिल्ली SC | हिमाचलप्रदेश SC | - |
| २३ | त्रिमाली | महाराष्ट्र NT | गुजरात NT | कर्नाटक SC | अरुणाचलप्रदेश SC | - |
| २४ | वासुदेव | महाराष्ट्र NT | गुजरात NT | मध्यप्रदेश NT | - | - |

वरील सर्व जमाती या कलावंत जमाती, कष्टाचे कामे करणाऱ्या जमाती, देव देवतांच्या नावाने भिक्षा मागणाऱ्या जमाती, ज्योतिष, भविष्य सांगणाऱ्या जमाती, व्यावसायिक जमाती, पशुपालक जमाती आणि पशुपक्षी यांच्या शिकारी करून जगणाऱ्या जमाती म्हणून त्यांना ओळखले जाते. वरील विवेचनाच्या आधारे आपणास असे म्हणता येईल कि, भारतात ज्या भटक्या विमुक्त जाती जमाती आहेत त्यांचे वेगवेगळ्या संवर्गात वर्गीकरण करण्यात आलेले आहे.

**संदर्भसूची –**


१. गारे गोविंद – २००५ – आदिवासी साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषण, सुगावा प्रकाशन,पुणे
२. चौधरी उद्धव – १९९६ – महाराष्ट्रातील आदिवासी संशोधन पत्रिका, पुणे
३. पिंगळे भीमराज – १९९० – वनताली व उपेक्षित जग – खंड २ अभिजन प्रकाशन बीड
४. माने लक्ष्मण – १९९७ – विमुक्तायन – महाराष्ट्रातील निवडक जमाती एक चिकित्सक अभ्यास, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
५. राठोड मोतीराज – २००५ – आदिवासी पारधी पुनर्वसनासाठी अभ्यास पहाणी पथकाचा अहवाल, धुळे
६. भोसले नारायण – २००८ – भटक्यांची जातपंचायत, परंपरा आणि संघर्ष प्रकाशन पुणे सहाय बी. एस – १९९७ – आदिवासी भटक्या जमातीच्या कल्याणाचा मार्ग